॥ गर्द सभोंती रान साजणी ॥

गायिकाः आशालता वाबगांवकर
गीतः त्र्य. ठोमरे
संगीतः पं. जितेंद्र अभिषेकी
नाटकः मत्स्यगंधा

गर्द सभोंती रान साजणी तू तर चाफेकळी
काय हरवले सांग शोधिसी या यमुनेच्या जळी?

ती वनमाला म्हणे, "नृपाळा हे तर माझे घर
पाहत बसते मी तर येथे जललहरी सुंदर
हरिणी माझी तिला आवडे फारच माझा गळा
मैना माझी गोड बोलते तिजला माझा लळा"

त्यावर राजा काय म्हणाला आहे ठाऊक? राजा म्हणालाः

"रात्रीची वनदेवि पाहुनी भुलतिल रमणी तुला
तू वनराणी दिसे न भुवनी तुझिया रूपा तुला
तव अधरावर मंजुळ गाणीं ठसली कसली तरी?
तव नयनी या प्रेमदेवता पसरे गालावरी
भुलले तुजला हृदय साजणी ये चल माझ्या घरी !"